| | |
|---|---|
| MHKO120003652010 | **<u>नियमित फौजदारी खटला क्र. ४८/२०१०</u>**<br>महाराष्ट्र शासन<br>वि.<br>श्रीपतराव विठ्ठल म्हांगोरे व इतर |

## <u>नि.क्र.१ वरील आदेश</u>

प्रस्तुतच्या खटल्यामध्ये आरोपींनी दि.०१/०४/२००२ ते दि.३१/०३/२००३ या कालावधीमध्ये एकमेकांशी संगणमत करुन श्री महालक्ष्मी नागरी सहकारी पतसंस्था मर्या. शेणगाव, ता. भुदरगड, जि. कोल्हापूर या संस्थेचा रक्कम रु.१२,४२,५५१/– चा अपहार करुन फसवणूक केली व त्यानंतर भा.दं.वि.सं. कलम ४०६, ४०८, ४२०, ४२६, ४६८, ४७१ अन्वये शिक्षापात्र अपराध केला. या अनुषंगाने माझे विद्वान पुर्वाधिकारी यांनी दोषारोप नोंदविला आहे, परंतु, अभियोग पक्षाचे हकीकतीचे अवलोकन केले असता दि.३१/०३/१९९७ या कालावधीपासून विविध लोकांना कर्ज बेकायदेशीर पद्धतीने वाटप केले व कर्जास हवी असणारी योग्य ती कागदपत्रे घेतली नाहीत, असा आरोप केला आहे व लेखापरीक्षण केलयावर फिर्यादीला दि.०१/०४/२००२ ते दि.३१/०३/२००३ या लेखापरीक्षणाच्या कालावधीमध्ये सदरील चुकीच्या कर्ज वाटपाची माहिती झाली, अशी अभियोग पक्षाची हकीकत आहे व सि.स.नं.१७६ मधील मिळकत मौ. शेणगाव ही तिचा लिलाव दि.२६/०१/२००३ रोजी चुकीच्या पद्धतीने केला व त्यानंतर दि.०२/०२/२००३ रोजी ३७,२८५/– इतकी रक्कम खरेदीखताकामी रोखीने जमा केली व रु.४९,०००/– ची बोली लागली असताना रु.३७,२८५/– ला खरेदीखत दाखविले. रु.११,७१५/– चे संस्थेचे नुकसान केले. तसेच संबंधित खरेदीखत दि.०४/०१/२००८ रोजी झाले असताना खरेदीखत पत्रासाठी रु.१,६२०/– मुद्रांक शुल्क संस्थेने खरेदी केले असून रु.८२०/– चा नोंदणी खर्च झाल्याचे दिसून येते व त्यामुळे देखील संस्थेचे नुकसान झाले असे निरीक्षण लेखापरीक्षक यांनी

लेखापरीक्षणामध्ये नोंदविले आहे. तसेच कर्ज वसुलीसाठी रु.४,०००/– चा खर्च व रु.३,५००/– चा खर्च योग्य वाटत नाही, असे देखील निरीक्षण त्यांनी नोंदविले आहे व त्यामुळे संस्थेचे नुकसान झाले असे त्यांचे मत आहे, परंतु, दोषारोपामध्ये त्या अनुषंगाने दुरूस्ती करणे जरुरीचे वाटते. तरी दोषारोपामध्ये त्या अनुषंगाने दुरूस्ती करुन बदललेला दोषारोप नोंदविण्यात येतो. तसेच तपासीअधिकारी यांनी भा.दं.वि.सं. चे कलम ४७७ अ लावले आहे, परंतु, यापूर्वी देखील माझे विद्वान पुर्वाधिकारी यांनी नि.क्र.१२२ ला दोषारोप नोंदविताना कलम ४७७ अ बाबतीत दोषारोप नोंदविलेला नाही व त्या कलमाबाबतीत दोषारोप नोंदविण्यात इतपत केस आरोपींविरुद्ध दिसून आलेली नाही व त्यामुळे तरी तपासीअधिकारी यांनी कलम ४७७ अ दोषारोपामध्ये लावला असला तरी ते कलम नोंदविण्या इतपत केस दिसून न आल्याने त्या कलमाबाबतीत दोषारोप नोंदविणे जरुरीचे वाटत नाही. तसेच माझे विद्वान पुर्वाधिकारी यांनी भा.दं.वि.सं. चे कलम ४२६ चे दोषारोप नोंदविले आहे, परंतु, ५० हजार पेक्षा अधिक रकमेचे नुकसान आरोपींच्या कृत्यामुळे झाले आहे, असा आरोप आरोपींवर आहे आहे. त्यामुळे भा.दं.वि.सं. चे कलम ४२६ ऐवजी कलम ४२७ हे कलम नोंदविण्यात येते. तसेच दि.११/०३/१९९७ ते दि.०४/०१/२००८ च्या कालावधीमध्ये गुन्हा घडला अशी तारीख दोषारोपामध्ये टाकली जाते व दुरूस्त दोषारोप नोंदविणे अपेक्षित आहे. तरी सदरील आदेशाची नोंद दोन्ही बाजूंनी घ्यावी.

NISHANT DIPAK RUDRABHATE

Digitally signed by NISHANT DIPAK RUDRABHATE
Date: 2026.05.28 16:37:00 +0530

(एन. डी. रुद्रभटे)

**दिनांक :** २८/०५/२०२६

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,

गारगोटी